**ठळक बातम्या**

- विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी नागरिकांनी संघटित होऊन स्वतःला समर्पित करण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतिनिमित्त मान्यवरांची आदरांजली, देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिली जाणारी केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं देशभरातल्या १ हजार ४६६ पोलिसांना जाहीर

- माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त देशभरातून अभिवादन

**आणि**

- भारताच्या महिला संघाची आयसीसी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी नागरिकांनी संघटित होऊन स्वतःला समर्पित करावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त गुजरातमधल्या एकता नगर इथं आयोजित राष्ट्रीय एकता दिवस समारंभात ते बोलत होते. २०१४ पासून सरकारनं नक्षलवाद आणि माओवादावर निर्णायक आणि शक्तिशाली प्रहार केला आहे. २०१४ पूर्वी देशभरातले जवळपास शंभर जिल्हे माओवादी कारवायांनी प्रभावित होते, पण आज ही संख्या अकरापर्यंत खाली आली आहे. तर, फक्त तीन जिल्हे नक्षलप्रभावी आहेत, असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

देश कमकुवत करणाऱ्या सर्व विचार किंवा कृती प्रत्येक नागरिकानं नाकारायला हवी, ही काळाची गरज असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली. स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या दृष्टिकोनाला मूर्त रूप देत ५५०हून अधिक संस्थानं एकत्र करून अशक्य वाटणारं काम साध्य केलं, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. देशभरात सुरू असलेल्या एकता दौडमध्ये कोट्यवधी भारतीयांचा उत्साह पाहून प्रधानमंत्री म्हणाले…

***होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री***

प्रधानमंत्री मोदी यांनी दिवसाची सुरुवात स्टॅच्यू ऑफ युनिटीला पुष्पांजली अर्पण करून केली. यावेळी त्यांनी एकता दिनाची शपथ घेतली, तसंच भव्य एकता दिन संचलनाचं निरीक्षण केलं. या संचलनामध्ये बीएसएफ, सीआरपीएफ आणि विविध राज्य पोलीस दलांच्या तुकड्या सहभागी झाल्या होत्या. या संचलनात विविधतेून एकता या संकल्पनेवर दहा चित्ररथही सहभागी झाले होते. त्यात महाराष्ट्राच्या चित्ररथाचाही समावेश होता.

**<><><><><>**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. सरदार पटेल हे महान देशभक्त आणि दूरदर्शी नेता आणि राष्ट्रनिर्माता होते. त्यांनी आपल्या अढळ संकल्प, अदम्य धैर्य आणि कुशल नेतृत्वानं राष्ट्राला एकत्र आणण्याचं ऐतिहासिक कार्य केलं, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सरदार पटेल यांना आदरांजली वाहिली. पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त मुर्मू यांनी आज सकाळी नवी दिल्लीतल्या पटेल चौकात पटेल यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं.

सरदार पटेल यांच्या दृढनिश्चय आणि दूरदृष्टीनं भारताला लोकशाही प्रजासत्ताकात एकत्र आणलं आहे. संस्थानांचं विलिनीकरण आणि एकतेसाठी पटेल यांचं अमूल्य योगदान प्रेरणादायी आहे, अशा शब्दात उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी पटेल यांना आदरांजली वाहिली. सरदार वल्लभभाई पटेल हे देशाच्या एकात्मतेमागची प्रेरक शक्ती होते. देशाची अखंडता, सुशासन आणि सार्वजनिक सेवेसाठी पटेल यांची अढळ वचनबद्धता पुढच्या प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही सरदार पटेल यांच्या पुतळ्याला पुष्पांजली वाहिली.

**<><><><><>**

भारतीय स्वातंत्र्यानंतर देशाला एकसंध राखण्यात आणि आजच्या भारताच्या निर्मितीत सरदार वल्लभभाई पटेल यांचं खूप मोठं योगदान असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले. सरदार पटेल यांच्या दीडशेव्या जयंतिनिमित्त नवी दिल्लीत आयोजित रन फॉर यूनिटीला त्यांनी आज प्रारंभ केला, त्यावेळी ते बोलत होते. ब्रिटीशांनी ५६२ संस्थानांमध्ये विभागलेला भारत जोडण्याचं काम पटेल यांनी केलं. आज जगाला दिसणारा आधुनिक भारताचा नकाशा हा पटेल यांच्या दूरदृष्टीचा आणि प्रयत्नांचा परिणाम असल्याचं शहा

म्हणाले. सरदार पटेल यांच्या जयंतिनिमित्त महाराष्ट्रासह देशभरात विविध ठिकाणी रन फॉर युनिटी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिली जाणारी केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं देशभरातल्या १ हजार ४६६ पोलिसांना जाहीर झाली आहेत. विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, केंद्रीय पोलीस यंत्रणांच्या कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे. कारवाई, तपास, गुप्तचर यंत्रणा आणि न्यायवैद्यक शास्त्र या चार क्षेत्रांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो, अशी माहिती गृहमंत्रालयानं दिली आहे.

<><><><><>

भारताच्या माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांची आज पुण्यतिथी आहे. यानिमित्त देशभरातून त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आज इंदिरा गांधींच्या ‘शक्तिस्थळ’ या समाधीस्थळी जाऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली. इंदिरा गांधींचं साहस, संवेदनशीलता आणि देशभक्ती आपल्यासाठी प्रेरणादायक असल्याचं राहुल गांधींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. भारताच्या आयर्न लेडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदिरा गांधींच्या जीवनातून कोट्यवधी भारतीयांना सतत प्रेरणा मिळेल, असे गौरवोद्गार काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काढले.

<><><><><>

आगामी बिहार विधानसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा भाजपा आणि जदयू प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं आज प्रसिद्ध केला. यात तरुण, रोजगार, कौशल्यविकास, शेतकरी, मागासवर्गीय, दलित आणि महिलांचं सक्षमीकरण यावर भर दिला असून येत्या पाच वर्षांत १ कोटी सरकारी नोकऱ्या आणि रोजगार निर्माण करायचं, तसंच एक कोटी महिलांना लखपती दीदी करायचं आश्वासन एनडीएनं दिलं आहे. शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीची हमी, प्रत्येक उपविभागात दलित विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबांना १० लाख रुपयांपर्यंतचं अर्थसहाय्य, तसंच किसान सम्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्यात ३ हजार

रुपयांची वाढ, प्रत्येक जिल्ह्यात मेगा कौशल्य केंद्रं आणि राज्यात १० नवी औद्योगिक संकुलं उभारली जातील, असंही जाहीरनाम्यात म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय पुढच्या वर्षी ३० जूनपर्यंत घेण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रात्री केली. सह्याद्री अतिथीगृहात यासंदर्भात आंदोलकांच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीनंतर ते बोलत होते. या अनुषंगाने एक समिती स्थापन करण्यात आली असून एप्रिलपर्यंत या समितीच्या शिफारशी येतील, त्यानुसार पुढच्या तीन महिन्यात कर्जमाफी मिळेल, असंही ते म्हणाले.

<><><><><>

भारताच्या महिला क्रिकेट संघानं आयसीसी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. नवी मुंबईत काल झालेल्या थरारक उपांत्य सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर ५ फलंदाज राखून मात केली. ऑस्ट्रेलियानं दिलेलं ३३९ धावांचं लक्ष्य भारताच्या संघानं ५ फलंदाजांच्या मोबदल्यात ९ चेंडू राखून पूर्ण केलं. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ ४९ षटकं आणि ५ चेंडूंत ३३८ धावा करून माघारी परतला. फीबी लिचफिल्ड हिनं ११९ धावांची खेळी केली, तर किम गार्थ आणि ॲनाबेल सदरलँड यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. प्रत्युत्तरादाखल, जेमीमा रॉडरिग्जच्या नाबाद १२७ आणि हरमनप्रीत कौर हिच्या ८९ धावांच्या खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियानं दिलेलं मोठं लक्ष्य भारताला पार करता आलं. श्री चरणी आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी दोन फलंदाजांना तंबूत धाडलं. जेमीमा रॉडरिग्ज हिला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. आता अंतिम फेरीत भारताची लढत शनिवारी नवी मुंबई इथं ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे.

<><><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या पुरुष क्रिकेट संघांदरम्यान पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतला दुसरा सामना आज मेलबर्न इथं होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी पावणेदोन वाजता सुरू होणाऱ्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. या मालिकेतला पहिला सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करावा लागला होता. त्यापूर्वीची एकदिवसीय सामन्यांची मालिका यजमान ऑस्ट्रेलियानं २-१ अशी जिंकली होती. //<><><><><>//